दु:ख करतोस. अस करु नकोस.... जे आज मिळाल आहे त्याच पुरेपूर आनंद घे व जे मिळाल नाही ते मिळविण्याची जिद्द बाळग.. ती मिळविण्यासाठी पराकष्टाने प्रयत्न कर"... ह्या आईच्या उपदेशाने माझी चूक माझ्या लक्षात आली. मला मिळालेल्या चांदीच्या छोट्याशा पेल्याकडे माझं लक्ष गेलं. तो पेला चमकत होता. मी हसू लागलो. आई माझ्याकडे पाहत मंद स्मित करत होती. माझ्या आईच्या एका वाक्यानं "जे आज मिळालय त्यांचा पुरेपूर आनंद घे व जे मिळालं नाही त्यासाठी जिद्दीने प्रयत्न कर... तुला ते उद्या नक्की मिळेल". ह्या एका वाक्यानं माझ सारं आयुष्य उजळून निघालं. त्यामुळे जे मला मिळावयास पाहिजे होते ते मला मिळाले नाही... त्याच दुःख मी करत कधीच बसलो नाही. उलट ते मिळविण्यासाठी मी प्रयत्न करत राहीलो. त्यामुळे मी सदोदीत कार्यरत राहिलो... कार्यरत राहिलो म्हणून तब्बेतही उत्तम राहिली व तब्बेतीने उत्तम राहीलो. म्हणूनच ह्या वयात सुदधा तुमच्या समोर मी उभा आहे.

त्यावेळी जो माझ्या चेहऱ्याला रंग लागला व ज्या पवित्र व बहुवेधी रंगमंच्याशी माझ नात जडलं ते परमेश्वराच्या कृपेने व आपल्या सारख्या रसिकांच्या अलोट प्रेमामुळे आजपर्यत कायम आहे. तेच नातं माझ्या शेवटापर्यत कायम राहवं ही आपल्याकडे व परमेश्वराकडे अनन्य भावे प्रार्थना.

रंगभूमी.... नाट्यकला... ही जिवंत रसरसलेली कला आहे. तारुण्याचा जोश त्यात आहे. अनुभवाची परिपक्कता त्यात आहे.... आदी मानवाने बोलण्याआधी हावभाव करत आपले विचार सांगण्यास सुरुवात केली म्हणजे नाट्य-कलेची सुरुवात झाली. ही कला अनादी काळापासुन सुरु झाली.... अनादी काळापर्यत चालणार आहे किंबहुना विश्वाच्या शेवटापर्यत ही कला राहणार आहे.

हे विश्व ब्रम्हदेवाने निर्माण केले. आम्ही रंगकर्मी (म्हणजे लेखक, स्टेजवर काम करणारे, स्टेजपाठीमागे काम करणारे, संगीतकार, नृत्यकार वगैरे) आमचं एक वेगळ विश्व निर्माण करतो. हे फक्त ४०X५० एवढ्याच जागेत असत. पण त्याचा आवाका विश्वाला कवेत घेणारा असतो. ह्यात कधी आजची समस्या असते तर कधी इतिहास दर्शन असते. कधी पुराण काळाचा वेध असतो...तर कधी ह्यात भविष्यकाळाची स्वप्ने रंगलेली असतात. हे विश्व आम्ही निर्माण करतो. पण ते तुमच्या प्रेक्षकांच्यासाठी असते. तिसरी घंटा होते. रंगमंच्यावर धुपाचा सुगंध पसरतो. एक